ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - II Marathi Part - II / Hindi April - June - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 5.2
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - VII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.2 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शिक्षणसंस्थांचे खाजगीकरण आणि व्यापारीकरण:- पांढरे हत्ती- रवींद्र शोभणे<br>**प्रा. अलका सिताराम कदम** | १-२ |
| २ | भारतीय शिक्षणाचा इतिहास<br>**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एफ. पाथ्रिकर**<br>**प्रा. डॉ. गणेश कड** | ३-८ |
| ३ | मराठी अध्यापनातील शिक्षकाची भूमिका<br>**प्रा. सौ. मिनाक्षी वेदांतराव रत्नपारखी** | ९-१३ |
| ४ | बदलत्या काळानुरुप शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्व: एक सर्वेक्षण अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुरेंद्र जी. ठाकुर** | १४-१८ |
| ५ | शिक्षकांचे शिक्षण आव्हान व संधी<br>**प्रा. रवींद्र म. कांबळे** | १९-२२ |
| ६ | वर्तमान संगीत शिक्षा तथा शिक्षकों का रस तत्वके संदर्भ में विश्लेषण।<br>**निर्झरी देसाई ठक्कर** | २३-२६ |
| ७ | मानसिक आरोग्याचा शाळेतील विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम<br>**मेश्राम रोशन दादाजी** | २७-३२ |


Govt. College of Arts & Science ★ Aurangabad.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - VII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.2 (www.sjifactor.com)

# ४. बदलत्या काळानुरुप शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्व: एक सर्वेक्षण अभ्यास

प्रा.डॉ. सुरेंद्र जी. ठाकुर
समाजशास्त्र विभाग, एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुं. ३२.

**प्रस्तावना**

सदरील संशोधनात विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या परस्परावलंबी व परस्परसंबंधी असणाऱ्या नातेसंबंधावर शिक्षण या घटकाच्या अनुषंगाने जाणवणारा समन्वय व सहकार्य यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षकाचे असणारे महत्व टिपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आलेला आहे.

'शिक्षण देणे'आणि 'शिक्षण घेणे' या अनन्यसाधारण महत्व असणाऱ्या महत्वकांक्षेपोटीच युगातील प्रत्येक काळात शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन घटक एकमेकांच्या आयुष्यात येवून स्वत:च्या आयुष्याला खरा अर्थ देण्याचा प्रयत्न करीत आलेले आहे. एक मात्र सत्य की, कालानुरुप दोघांच्याही उद्दिष्टांमध्ये आणि गरजेमध्ये कमालीचे परीवर्तन झाल्याचे पहावयास मिळते आहे. शिक्षण या गरजेपोटी किंवा लालसेपोटी शिक्षक आणि विद्यार्थी प्रत्येक काळात एकत्रित येवून एक नातेसंबंध निर्माण करताना दिसतात, एकमेकांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करतात, तर वेळ प्रसंगी सर्वस्व अर्पण करण्याचा प्रयत्नही करताना दिसतात, पण हे कालानुरुप काहीसे दुर्मिळ म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

काही व्यक्तीच्या मते, ''शिक्षण म्हणजे साक्षरता होय''. तर काहींच्या मते, व्यक्तीच्या अंगी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण होय. सांगायचे तात्पर्य हेच की, कालानुरुप शिक्षणाचा अर्थ हा सुध्दा वरवरचा, तात्पुरता व मर्यादित उद्दिष्टांपुरता दिसायला लागला. परिणामी वैभवशाली प्राचीन भारतीय शिक्षण पध्दती, गुरु-शिष्य नातेसंबंध, प्राचीन जगविख्यात विद्यापीठे जसे की, तक्षशिला, नालंदा आणि मिथिला विद्यापीठ इ. सर्वच अंगाने बदलून जावून विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील शिक्षकाच्या असणाऱ्या अनन्यसाधारण महत्वालाही काहीसा तडा गेल्याचे चित्र सार्वत्रिक पहावयास मिळते आहे.

मानवाला इतर सर्व प्राण्यांहून सर्वश्रेष्ठ त्याच्या बुध्दीमत्तेमुळे मानले जाते. त्याच बुध्दीमत्तेच्या जोरावर मानवाने सर्वांगिण क्षेत्रात अप्रतिम व दैदिप्यमान प्रगती साधली आहे. परंतु बुध्दीमत्तेचा विकास योग्यमार्गाने व सुयोग्यरितीने होण्यासाठी त्या त्या काळातील शिक्षण पध्दती व ती शिक्षणपध्दती अंमलात आणण्यासाठी ज्यांनी आपले आयुष्य वाहिले त्या ऋषीमुनी किंवा गुरुवर्य किंवा आचार्य किंवा शिक्षकांचा सिंहाचा वाटा म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नव्हे.

प्राचीन भारतीय शिक्षणपध्दती ही 'गुरु-शिष्य' परंपरा जोपासणारी आणि म्हणून मातापित्यापेक्षाही गुरुंना आदर, मान-सन्मान व अनन्यसाधारण महत्व देणारी समाजव्यवस्था होती. आजच्या आधुनिक काळातही शिक्षकांचे महत्व आहे, पण पुर्वीसारखे, पूर्वीइतके उच्चकोटीचे सन्माननीय म्हणण्याचे धाडस होत नाही. सांगायचे तात्पर्य हेच की, प्राचीनकाळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण आयुष्याला कलाटणी देणारी शिक्षणपध्दती आजमितीला अस्तित्वात नाही, आणि विद्यार्थ्यांना शारिरीक, मानसिक, बौध्दीक, वैचारिक, अध्यात्मिक, धार्मिक व व्यावसायिक शिक्षणाचे धडे देण्यासाठी अहोरात्र, आजन्म, अखंड व निरंतर



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

स्वरुपात ज्ञानसाधना करणाऱ्या गुरुची उणीव हे आमच्या समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण बनू पहात आहे. परिणामी आजच्या शिक्षणपध्दतीत जीवननिर्वाह पेलविणारी एक व्यवस्था आणि विद्यार्थी-शिक्षक नातेसंबंधात व्यावहारिकतेला अधिक प्राधान्य प्राप्त झाल्याचे चित्र आहे.

**काळानुरुप शिक्षक आणि विद्यार्थी सहसंबंध**

प्राचीन काळातील शिक्षकांना गुरुवर्य, मुनिवर्य, आचार्य किंवा ऋषी या उपाधीने तर विद्यार्थ्यांना 'शिष्य' म्हणून उच्चारले जायचे. प्राचीन शिक्षणव्यवस्थेतील आचार्य हे परमार्थमार्गी, चारित्र्यसंपनन, नि:स्पृह, न्यायप्रिय, शास्त्रांचे मर्म अवगत असणारे, वेदविद्येत निपूण, हृदयमनाची पवित्रता जोपासणारे, धार्मिक विद्वान व पंडीत असत. ज्ञानदानाचे व्रत घेतलेले हे ऋषी आपल्या शिष्यांप्रती अहोरात्र, निरंतर, आजन्म व अखंड ज्ञानसाधना करुन त्यांची शारिरीक, बौध्दीक, भावनिक, वैचारिक, अध्यात्मिक, आर्थिक व व्यावसायिक प्रगती साधण्याचा उदात्त हेतूनी बांधील होते. परिणामी ज्ञानदानाचे व्रत घेतलेल्या अशा गुरुबद्दल शिष्यांच्या मनात साहजिकच श्रध्दा, निष्ठा, विनय, भक्ती, शरणागती, आदर व आत्मसमर्पण करण्याची वृत्ती होती. याउलट आधुनिक काळात शिक्षकाचे महत्व आहे, पण पुर्वीसारखे, पुर्वीइतके किंवा अखंडपणे चालू राहणारे शिक्षण आज दुर्मिळ झाले आहे. परिणामत: शिक्षणाची धुरा सांभाळणारे शिक्षक आणि विद्यार्थी हे कालानुरुप बदलणे स्वाभाविकच होते. आजच्या शिक्षणपध्दतीतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परस्परसंबंधी असणाऱ्या अपेक्षा, जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये आणि नातेसंबंधात बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाने सिंहाचा वाटा उचलल्याने हे नातेसंबंध काहीसे वरवरचे, तात्पुरते व कृत्रिम होत जावून, शिक्षक हा दिशादर्शक किंवा मार्गदर्शक आणि विद्यार्थी 'परिक्षार्केंद्रित' निर्माण झाल्याचे चित्र सार्वत्रिक आहे. थोडक्यात आधुनिकी शिक्षणपध्दतीतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंधात व्यवहारिकतेला प्राधान्य आल्याने त्यांच्यातील आत्मियता, जिव्हाळा व आपलेपणा काहीसा लोप पावत चालल्याचे चित्र आहे.

**उद्दिष्टये आणि संशोधन पध्दती**

**उद्दिष्टये**

१. प्राचीन शिक्षक आणि विद्यार्थी यांचे सहसंबंध स्वरुप जाणून घेणे.
२. सद्यकालीन विद्यार्थी आणि शिक्षक यांचे सहसंबंध समजून घेणे.

**संशोधन आराखडा**

१. गुणात्मक आणि संख्यात्मक अशा दोन्ही मिश्र पध्दतीचा आधार सदर संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

**नमुना आराखडा**

१. तथ्य संकलन स्त्रोत : प्राथमिक आणि द्वितीय अशा दोन्ही स्त्रोताचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला.
२. नमुना तंत्र पध्दती : संभाव्यता नमूना तंत्र पध्दतीचा वापर करुन उत्तरदात्यांची निवड करण्यात आली.
३. नमूना आकार : एकूण ५० उत्तरदात्यांची निवड दक्षिण मुंबईतील महाविद्यालयातील (विद्यार्थ्यांची) करुन त्यांच्याकडून तथ्यांचे संकलन करण्यात आले.

सदरील संशोधनासाठी 'एसपीएसएस' या सॉफ्टवेअरचा वापर करुन तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science,
Aurangabad

**विश्लेषण व चर्चा**

मानव हा विकसनशील व बुध्दीवान प्राणी असल्यामुळे स्वत:च्या विकासासाठी तो जन्मापासून ते मरेपर्यंत सातत्याने धडपडत असल्याचे आढळते. अगदी रानटी अवस्थेत, निसर्गाकडे पाहून, निसर्गाचे अनुकरण करुन आणि प्रसंगी निसर्गालाच आपला गुरु मानून जीवनपयोगी असे ज्ञान घेण्याची परंपरा होती. मानवाने निसर्गातील नद्या, नाले, पर्वत, वृक्ष व वेली या सर्वांकडून जीवन उपयुक्त असे ज्ञान ग्रहण करीत आलेला आहे. जसे की, जंगलात लागलेला वणवा पाहूनच आगीचा शोध लागला, पर्वतातील गुंफा पाहून घर बनविण्याचे कौशल्य संपादन केले, आणि स्वच्छंदी विहार करणाऱ्या पक्षांना पाहूनच विमानाचा शोध लागलेला आहे वगैरे. एका अर्थाने प्राचीन आदिम मानवाने निसर्गाच्या अनुकरणातून, काही वेळा स्वत:च्या अनुभवातून, काही वेळा कुटुंबियांकडून तर कधी समाजातील जेष्ठ व्यक्तींकडून ज्ञान संग्रहित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

निसर्गानंतर प्राचीन भारतीय शिक्षणाचा उद्‌गाता म्हणून महान ऋषी किंवा मुनिवर्य इत्यादींचा विचार होतो. प्राचीन ज्ञानार्जन करणारी प्रसिध्द विद्यापीठे म्हणून तक्षशिला, काशी, नालंदा, वल्लभी, विक्रमशिला आणि मिथिला विद्यापीठांचा आंतर्भाव होतो. या प्रसिध्द विद्यापीठात ज्ञानार्जन करणारी त्याकाळची काही विद्‌वान मंडळी जसे की, व्याकरणकार महान पंडीत पाणिती, औषधविद्याशास्त्र वैद्यजीवक, दिडनाग, स्थिरमती, धर्मपाल, विद्यापती, गुणमती, शीलभद्र, जगदधर, प्रभामित्र, दिपंकर, वात्सायन आणि विदुषी गार्गेयी व मैत्रेयी इत्यादींचा मुख्यत्वे करुन उल्लेख करता येईल.

संबंधित विद्यापीठात मुख्यत्वेकरुन जीवनावश्यक असणाऱ्या सर्वच अंगाचा अभ्यासक्रम शिकविला जायचा, जेणेकरुन उत्तम आदर्श नागरिक म्हणून ज्याला समाजात नावलौकीक सहज प्राप्त होत असे. अभ्यासक्रमातील मुख्य अभ्यासविषय म्हणून शेती, व्यापार, गणित, गृहशास्त्र, ज्योतिषशास्त्र, युध्दशास्त्र, राज्यशास्त्र, शिल्पशास्त्र, वेदांत, व्याकरण, आयुर्वेद, वेदविद्या, नितीशास्त्र, तर्कशास्त्र, जादूविद्या, तत्वज्ञान, अध्यात्मशास्त्र, न्यायशास्त्र, चित्रकला, नृत्यकला, व्यवहारशास्त्र, साहित्यशास्त्र, दर्शनशास्त्र, तंत्रमंत्रशास्त्र, कर्मकांड, उपनिषदे, संगीतकला, ललितकला आणि विज्ञानविषय इत्यादीसारख्या जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्शून जाणाऱ्या विषयांचा अंतर्भाव इथे झाल्याचे आढळते. हया विषयांची उत्कृष्टता, दर्जेदारपणा व गुणवत्ता इतकी उच्चतम होती की, येथील शिक्षणासाठी ग्रीस, तुर्कसथान, इराण, इराक, ताश्कंद व भारतातील कन्याकुमारी पासून ते काश्मीरपर्यंतचे आणि बंगालच्या उपसागरापासून ते अरबी समुद्रापर्यंतचे विद्यार्थी येथे ज्ञार्नाजनासाठी स्पर्धा करीत असत.

प्राचीन विद्यापीठातील आचार्य अर्थात शिक्षक हे खऱ्या अर्थाने परमार्थमार्गी, धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांचे चारित्र्य सर्वगुण संपन्न व निष्कलंक असायचे. हे अतिशय त्यागी, न्यायप्रिय व नि:स्पृह होते. हे आपल्या विद्यार्थ्यांमध्ये कोणताही भेदभाव करीत नसत. त्यांचे सर्वच विद्यार्थ्यांवर जीवापाड प्रेम असायचे. हे विद्‌वान पंडीत असल्याने व त्यांनी ज्ञानदानाचे व्रत घेतले असल्याने त्यांची विद्यार्थ्यांशी अधिकची निष्ठा होती. येथील शिष्यवृंद अर्थात विद्यार्थी सुध्दा गुरुला शोभणारा असा कष्टाळू, आज्ञाधारक, ज्ञानी, ज्ञानोपार्जनाची खरी तृष्णा व चिकाटी असणारा आणि गुरुजनांवर प्राणापेक्षाही अधिक प्रेम करणारे होते. येथील विद्यार्थी अतिशय शिस्तप्रिय, अनुकरणीय, सत्यप्रिय, गुरुच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी सर्वस्व त्याग करणारे व ज्ञानसाधनेत अखंडपणे रमणारे असे होते.

तात्पर्य हेच की, शिष्य आणि आचार्य यांचे नातेसंबंध अतिशय जिव्हाळयाचे, आपलेपणाचे व नैसर्गिक असे होते. त्यांचा एकमेकावंर गाठ विश्वास, श्रध्दा, निष्ठा, स्नेह व आपुलकी असायची. सर्वच विद्यार्थ्यांवर गुरुंचा खोलवर अतिप्रभाव



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - VII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.2 (www.sjifactor.com)

असल्याने त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक वळणावर गुरुंचे पूर्णनिष्ठेने सहकार्य, पाठिंबा व सहभाग पहावयास मिळायचा. अर्थात हे शिष्य म्हणजे आपआपल्या गुरुचे प्रतिबिंब असल्याचे जाणवत असत.

प्राचीनकाळी शिक्षणाचा आणि व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा म्हणजे त्याचे शील, चारित्र्य, सदवर्तन यांचा अतिशय निकटचा संबंध होतो. प्रत्येकक्षणी तो गुरुच्या चरणी, विद्यार्थ्यांच्या ठायी व शिक्षणव्यवस्थेत प्रतिबिंबीत होताना दिसायचा. पण हळूहळू गुरु-शिष्य परंपरा लोप पावत जावून विद्यार्थी आणि शिक्षक हा नवा वर्ग तयार होवू लागला. हया वर्गाचा महत्वाचा आधार हा व्यावहारिकता आणि उपयोगितावाद असल्याचे आढळते. इथे व्यावसायिकदृष्टया शिक्षणाकडे पाहण्याची मानसिकता विकसित होवू लागली. शिवाय गरजेपुरते ज्ञान किंवा गरज पडले तेव्हा आणि गरजेपुरती नातेसंबंध अशी नवीन नातेसंबंध निर्माण होवू पाहत आहे. येथील शिक्षकांचे अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या हे येथील शिक्षणसंस्था, विद्यापीठ अगर विद्यापीठ अनुदान आयोग निश्चित करु लागले. परिणामी शिक्षक हा पूर्णत: शिक्षक राहिला नसून तो काहिसा कारकून किंवा प्रशासक बनू लागला आहे. म्हणूनच परीक्षा पध्दती, अभ्यासक्रमनिहाय वाचन आणि ग्रेडनिहाय मुल्यमापन पध्दतीला दिवसेंदिवस अधिकचे महत्व प्राप्त झाले आहे. परिणामी दिवसागणिक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये आंतर निर्माण होत जावून त्यांच्यातील आपलेपण, जिव्हाळा व स्नेहभाव कमी होवू लागतो आहे. तात्पर्य हेच की, आजच्या शिक्षण व्यवस्थेतील महत्वाचा घटक असणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांमधील स्नेहभाव संबंध हे वरवरचे, तकलादू, कृत्रिम व तात्पुरत्या स्वरुपाचे निर्माण होवून, शिक्षकांची विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी भूमिका काहीसी संकूचित बनली असल्याचे पहावयास मिळते आहे.

बदलत्या काळानुरुपशिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील जडणघडणीत जे योगदान आहे ते खालील माहितीच्या आधारे सविस्तर विश्लेषण करता येईल. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील जडणघडणीत शिक्षकांचे महत्व कसे आहे ? असा प्रश्न विचारला असता सर्वाधिक एकूण ३८ टक्के उत्तरदात्यांनी 'जास्त' महत्व या पर्यायाला निवडले तर एकूण ३० टक्के उत्तरदात्यांनी 'खुपच जास्त' महत्व हा पर्याय निवडून शिक्षकांना आदरतिथ्य प्रदान केले. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील शिक्षकांचे महत्व खुपच थोडे असल्याचे एकूण ८ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले.

शिक्षकांकडून अपेक्षित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपेक्षा कितपत पूर्ण झाल्या आहेत याबाबत विचारले असता असे लक्षात आले की, खुपच जास्त पूर्तता झाल्याचे म्हणणे एकूण १४ टक्के उत्तरदात्याचे होते. जास्त अपेक्षांची पूर्तता झालेल्यांची व थोडयाच अपेक्षांची पूर्तता झाल्याचे प्रमाण अनुक्रमे ५० टक्के व १४ टक्के एवढे होते.

सद्यकालीन विद्यार्थ्यांच्या शिक्षकांकडून अपेक्षित असणाऱ्या अपेक्षांबद्दल विचारले असता, वेळेवर तासिका घेणे, विषयनिहाय ज्ञान देणे, साधी सरळ भाषा वापरावी, मार्गदर्शन करावे, अभ्यासात गोडी नसणाऱ्या विद्यार्थ्यांकडे अधिकचे लक्ष देणे, व्यक्तिला चांगला मानव घडविणे आणि शैक्षणिक सहलीचे आयोजन करावे हया बाबी नमुद केलेल्या आहे.

**निष्कर्ष**

प्रत्यक्षात सद्यकालीन विद्यार्थी हा केवळ परीक्षाकेंद्रित असल्याने गुण किंवा ग्रेड हेच त्यांच्यासाठी सर्वस्व आहे, त्यामुळे त्यांच्या आयुष्यातील शिक्षकांचे महत्व केवळ ज्ञानार्जन किंवा मार्गदर्शक इतक्या मर्यादित उद्देशापुरता आहे. खुपच कमी विद्यार्थ्यांना 'चांगला माणुस बनणे' हे महत्वाचे वाटते. अर्थात उपयोगितावाद हा विद्यार्थ्यांचा महत्वाचा उद्देश बनु पहात आहे. शिक्षक सुध्दा वेळेवर तासिका न घेणे, अभ्यासक्रमाची पुरेपूर तयारी न करणे, विषय क्लिष्ट करुन सांगणे, योग्य मार्गदर्शनाचा अभाव इत्यादि सारख्या प्रश्नांनी ग्रस्त असल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्याप्रती आत्मीयता, निष्ठा, श्रध्दा, आपलेपणाची भावना



PRINCIPAL
Govt. College of A... Aurangabad

निर्माण होण्याची शंकाच आहे ! सांगायचे तात्पर्य हेच की, विद्यार्थ्यांचा शिक्षण घेण्यामागचा उदात्त हेतू जसा लोप पावत आहे, तसा शिक्षकांचीही विद्यार्थ्यांवरील व शिक्षणावरील निष्ठा कमी होताना दिसती आहे. परिणामी दोघांचे सहसंबंध हे तात्पुरते, कृत्रिम, वरवरचे आणि समाजव्यवस्थेला बाधक बनू पहात आहे.

**संदर्भसूची**

१. लीला पाटी, परिवर्तनशील शिखण, उन्मेष प्रकाशन, पूणे, १९९५.

२. खोत म.आ., 'राष्ट्रीय संपत्ती मुले', कोल्हापूर जिल्हा सहकारी मुद्रण व प्रकाशन संस्था लि. कोल्हापूर, १९६८.

३. स्वामी न्योम रुपानंद स्वामी विवेकानंद, शिक्षण, नाग, मुद्रणालय, नागपूर १९८५.

Govt. College of Arts & Science * Aurangabad *

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad